# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Regional Development Authority, Pune**

स.नं. १५२ - १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे - ४११००७.

S.No. 152 - 153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411007

Ph No: 020 - 259 33 344 / 356 / 333 / फोन नं. : ०२० - २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३ Email :hqpmrda@gmail.com

PUNEMETROPOLIS




## अंशतः भोगवटा प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )

**जा.क्र : बीएमयु/मौ.बावधन बु./ स.नं. ५६/प्र.क्र.७६०/१६-१७, दि.२६/०८/२०१८**

प्रति,

श्री. कृष्णा दौलत मोकाशी व इतर तर्फे कु.मु.धा.

मे. करण डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. सुनिल शंकरराव जाधव

पत्ता - फ्लॅट नं. २०२, नयनतारा बिल्डींग, भांडारकर रोड, पुणे ४११००४.

मौजे बावधन बु., तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील स.नं. ५६ क्षेत्र १११००.०० चौ.मी. या जागेवर इमारतीचे बांधकाम जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्र. पमअ/एनए/एसआर/१२७ दि. २२/०१/२०१५ अन्वये परवानगी दिलेली आहे. तसेच प्राधिकरणाकडील जा.क्र. बीएमयु/ मौ. बावधन बु./ स.नं. ५६/ प्र.क्र. ७६०/१६-१७ दि. २४/१०/२०१६ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. प्रकाश कुलकर्णी लायसन्स नं. CA/९८/२२९०९ परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम पूर्ण /अंशतः पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि- १८/७/२०१८ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

**यापूर्वी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेल्या इमारतींच्या बांधकामाचा तपशिल**

| अ.क्र | इमारत | मंजूरीप्रमाणे | प्रत्यक्ष जागेवर | मजला | सदनिका क्र. | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|
| I. | बी | पार्किंग + पोडियम पार्किंग + ११ मजले | पार्किंग + पोडियम पार्किंग + १० मजले | पहिला | १०१,१०२,१०७, १०८,१०९ | ०५ |
| | | | | दुसरा | २०१,२०२,२०६, २०७, २०८,२०९ | ०६ |
| | | | | तिसरा | ३०१,३०२,३०६, ३०७, ३०८,३०९ | ०६ |
| | | | | चौथा | ४०१,४०२,४०५, ४०६, ४०७, ४०८,४०९ | ०७ |
| | | | | पाचवा | ५०१,५०२,५०६, ५०७, | ०६ |

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ५०८,५०९ | |
| | | | | सहावा | ६०१,६०२,६०४, ६०६, ६०७, ६०८,६०९ | ०७ |
| | | | | सातवा | ७०१,७०२,७०६, ७०७, ७०८,७०९ | ०६ |
| | | | | आठवा | ८०१,८०२,८०८,८०९ | ०४ |
| | | | | नववा | ९०१,९०२,९०८,९०९ | ०४ |
| | | | | दहावा | १००१,१००२,१००८,१००९ | ०४ |
| | | | | | एकुण | ५५ |

## आता भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या इमारतींच्या बांधकामाचा तपशिल

| अ.क्र | इमारत | मंजूरीप्रमाणे | प्रत्यक्ष जागेवर | मजला | सदनिका क्र. | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|
| I. | बी | पार्किंग + पोडियम पार्किंग + ११ मजले | पार्किंग + पोडियम पार्किंग + ११ मजले | पहिला | १०३,१०४,१०५,१०६ | ०४ |
| | | | | दुसरा | २०३,२०४,२०५ | ०३ |
| | | | | तिसरा | ३०३,३०४,३०५ | ०३ |
| | | | | चौथा | ४०३,४०४ | ०२ |
| | | | | पाचवा | ५०३,५०४,५०५ | ०३ |
| | | | | सहावा | ६०३,६०५ | ०२ |
| | | | | सातवा | ७०३,७०४,७०५ | ०३ |
| | | | | आठवा | ८०३,८०४,८०५,८०६,८०७ | ०५ |
| | | | | नववा | ९०३,९०४,९०५,९०६,९०७ | ०५ |
| | | | | दहावा | १००३,१००४,१००५,१००६,१००७ | ०५ |
| | | | | अकरावा | ११०३,११०४,११०५,११०६ | ०४ |
| | | | | | एकुण | ३९ |

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने**

26/7/18,

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**
ग्रामसेवक, मौजे बावधन बु. ता मुळशी, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-२६/०८ २०१८ रोजीचे पत्र क्र. ६६० सोबतचे
९६-९८

परिशिष्ट ' ब '

१) अर्जदार /सदनिका धारक/गाळे धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) उंच इमारतींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकाचे मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी पत्र.क्र. FB/१२१ , दि- ६/४/२०१८ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तींची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/ विकासक यांनी दि . १९/७/२०१८ रोजी रुपये- ५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भोगवटा /अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

६) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतींचे बांधकाम मंजूर नकाशानुसार पूर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार /मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

८) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील

९) सदर प्रकरणी अर्जदार / विकासक यांनी दि. १९/७/२०१८ रोजीचे हमीपत्रानुसार सदनिकेचा जागेवर वापर चालू करणेपूर्वी MPCB कडून Consent to Operate घेणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

१०) सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या Ministry of civil aviation ची अधिसूचना क्र. G.S.R. ७५१ (E) दि. ३०/९/२०१५ नुसार आवश्यक असल्यास भारतीय सर्वेक्षण विभागाचे अभिप्रायासह Civil Aviation चे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे अर्जदार / विकासक यांना आवश्यक राहील.

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने**

२८/७/१८

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा